Literacy for a Billion

Movie: Ha Khel Savlyancha
Year: 1976

Song: Kajal Ratin Odhun Nela
Lyricist: Sudhir Moghe

काजल रातीनं ओढून नेला
काजल रातीनं ओढून नेला
सये साजण माझा हो...
जीव ये भरूनी भिजते पापणी
कधी रे येशील राजा
काजल रातीनं ओढून नेला
साजण रातीनं

काजल रातीनं ओढून नेला
काजल रातीनं ओढून नेला
सये साजण माझा हो...
जीव ये भरूनी भिजते पापणी
कधी रे येशील राजा
काजल रातीनं ओढून नेला
काजल रातीनं

पाऊस येडापिसा जिवाला
लावून गेला ता
तूफान आलं सुसाट माझा
करून गेला घात
कातरवेळी करणी झाली
हरवून गेला राजा
काजल रातीनं ओढून नेला
ओढून नेला ओढून नेला

सुकली फुलांची शेज राया
राहिला अर्धा डाव
उधळून जाता खेळ वाया
श्वासांनी सोडीला ठाव
भुकेली ज्वानी जळते आतूनी
ये रे ये एकदा राजा
काजल रातीनं ओढून नेला
सये साजण माझा हो...
जीव ये भरूनी भिजते पापणी
कधी रे येशील राजा
काजल रातीनं ओढून नेला
काजल रातीनं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*